पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

# वार्तापत्र

**दिनांक: १७/०५/२०२०**

.

भामरागड उपविभागांतर्गत येणाऱ्या पोमके कोठी हद्दीतील मौजा पोयरकोटी – कोपर्शी जंगल परिसरात भामरागड क्युआरटी व विशेष अभियान पथकाचे जवान संयुक्तपणे नक्षलविरोधी अभियान राबवित होते.

आज सकाळी ६.०० ते ६.३० वाजताच्या सुमारास पोलीस व नक्षल यांच्यात चकमक झाली. या चकमकीमध्ये नक्षलवाद्यांचा बहादुरीने सामना करत असतांना गडचिरोली पोलीस दलाचे पोउपनि धनाजी होनमाने आणि पोलीस शिपाई /५२०१ किशोर आत्राम हे शहीद झाले. पोउपनि धनाजी होनमाने यांना काही दिवसांपुर्वीच त्यांनी नक्षलविरोधी केलेल्या उत्कृष्ठ कामगीरीसाठी मा. पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहीर झाले होते.

गडचिरोली पोलीस दलाचे बहादुर जवान व नक्षल यांच्यात झालेल्या या चकमकीत जवानांनी नक्षलवाद्यांना चोख प्रत्युत्तर देत ४ ते ५ नक्षलवाद्यांना ठार केल्याची शक्यता आहे. या घटनेनंतर सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.



शहिद पो.उप.नि.धनाजी तानाजी होनमाने



शहिद पो.शि./५२०१ किशोर लक्ष्मण आत्राम